# महिला कक्ष

# अहवाल-२०२१-२२




महिला कक्ष व अंतर्गत तक्रार समिती उद्घाटन प्रसंगी प्रास्ताविक करताना प्रा.डॉ.जयश्री कुलकर्णी व उद्घाटनपर मार्गदर्शन करताना डॉ.अनार साळुंके

दि-२३/१२/२०२१



# महिला कक्ष व अंतर्गत तक्रार समिती(ICC)चा उद्घाटन समारोह

## दि. २३.१२.२०२१, गुरुवार

**उद्देश :-**

महिला कक्ष व अंतर्गत तक्रार समिती यांचे महाविद्यालय अथवा कुठल्याही कामाच्या ठिकाणी असलेले प्रयोजन,उद्देश,कार्य,कार्यपद्धती,महत्व, तसेच समितीतील सदस्य या सर्वांचा परिचय विद्यार्थी व कर्मचाऱ्यांना करून देणे व विद्यार्थ्यांना महाविद्यालायाच्या परिसरातील वर्तन नियमावलीची ओळख करून देणे हा या कार्यक्रमाच्या आयोजनामागील उद्देश होय.

गुरुवार दिनांक २३.१२.२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता महिला कक्ष आणि अंतर्गत तक्रार समितीचा उद्घाटन कार्यक्रम संयुक्तरीत्या कक्ष क्रमांक १८ मध्ये आयोजित करण्यात आला. यावेळी सर्वप्रथम उपस्थित उद्घाटक व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर महिला कक्ष प्रमुख प्रा. डॉ. कुलकर्णी जे. आर. यांनी आपल्या प्रास्ताविकात महिला कक्ष व अंतर्गत तक्रार समिती यांचे महाविद्यालय अथवा कुठल्याही कामाच्या ठिकाणी असलेले प्रयोजन,उद्देश,कार्य,कार्यपद्धती,महत्व, तसेच समितीतील सदस्य या सर्वांचा परिचय करून दिला व विद्यार्थ्यांना महाविद्यालायाच्या परिसरातील नियमावलीची ओळख करून दिली. त्यानंतर महाविद्यालयाच्या माजी प्राचार्य व कार्यक्रमाच्या उद्घाटक डॉ. सौ अनार साळुंके यांनी उद्घाटनपर मार्गदर्शन केले. यावेळी त्या म्हणाल्या कि, महाविद्यालयातील वातावरण निकोप राहण्यासाठी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी नियमांचे पालन करण्याबरोबरच मैत्रीपूर्ण वातावरणात संयम व प्रगल्भतेचे वर्तन करणे आवश्यक आहे. तर अध्यक्षीय सामारोपामध्ये महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. श्री प्रशांत चौधरी यांनी विद्यार्थ्यांना काही अडचणी,तक्रारी असल्यास त्याचे त्वरित निवारण करण्याचे आश्वासन दिले.

या कार्याक्रमास एकूण ४३ विद्यार्थी व ७ शिक्षक कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.डॉ.अर्चना बनाळे यांनी केले, तर आभारप्रदर्शन प्रा.डॉ.मिलिंद माने यांनी केले. कार्यक्रमाची सांगता सामुहिक पसायदानाने करण्यात आली.

उद्देशपूर्ती :-

महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांना तसेच कर्मचाऱ्यांना महिला कक्ष व अंतर्गत तक्रार समिती, त्यांचे कार्य, उद्देश व मदत मिळविण्यासाठी असलेली कार्यपद्धती याविषयी माहिती मिळाली. विशेषतः महिला कर्मचारी व विद्यार्थिनींना महाविद्यालय परिसर त्यांच्यासाठी पूर्णतः सुरक्षित असल्याची खात्री पटली. सर्व विद्यार्थ्यांना महाविद्यालायाच्या परिसरातील नियमावलीची ओळख झाली.




महाविद्यालयातील महिला कक्ष व अंतर्गत तक्रार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आणि सखी वनस्टॉप सेंटर- महिलांसाठी सरकारमान्य मदत केंद्र, उस्मानाबाद यांच्या सहकार्याने विद्यार्थिनींसाठी स्वच्छता- आरोग्यविषयक, स्वयंसुरक्षा विषयक व कायदेशीरमार्गदर्शन उद्घाटनकार्यक्रम.- ११/०४/२०२२






**महाविद्यालयातील महिला कक्ष व अंतर्गत तक्रार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आणि सखी वनस्टॉप सेंटर-
महिलांसाठी सरकारमान्य मदत केंद्र, उस्मानाबाद यांच्या सहकार्याने विद्यार्थिनींसाठी स्वच्छता-
आरोग्यविषयक, स्वयंसुरक्षा विषयक व कायदेशीरमार्गदर्शन कार्यक्रम.- ११/०४/२०२२**






महाविद्यालयातील महिला कक्ष व अंतर्गत तक्रार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आणि सखी वनस्टॉप सेंटर- महिलांसाठी सरकारमान्य मदत केंद्र, उस्मानाबाद यांच्या सहकार्याने विद्यार्थिनींसाठी स्वच्छता- आरोग्यविषयक, स्वयंसुरक्षा विषयक व कायदेशीर मार्गदर्शन कार्यक्रम प्राचार्य डॉ.चौधरी यांचे मनोगत.- ११/०४/२०२२



# महात्मा फुले जयंतीनिमित्त महाजन महाविद्यालयात मुलींसाठी स्वयंसुरक्षा व कायदेशीर मार्गदर्शनाचे आयोजन

उस्मानाबाद / प्रतिनिधी

क्रांतिसूर्य महात्मा फुले जयंतीनिमित्त येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय व सखी वनस्टॉप सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन मुलींसाठी आरोग्य व स्वच्छता, कायदेशीर सल्ला व मार्गदर्शन तसेच स्वयंसुरक्षा या बाबत मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




या कार्यक्रमास श्रीमती रेखाताई महाजन, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. प्रशांत चौधरी, सखी वनस्टॉप सेंटरच्या वासंती मुळे, मनीषा जोगदंड, शुभांगी माने, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख अनिता लिंगे, अंतर्गत मूल्यमापन कक्ष प्रमुख अर्चना बनाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयातील अंतर्गत तक्रार समिती, महिला कक्ष व सखी वनस्टॉप सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमात वासंती मुळे यांनी आरोग्य, स्वयंसुरक्षा व लिंगभाव समानता या विषयावर मार्गदर्शन केले. मनीषा जोगदंड यांनी मुलींच्या समुपदेशनाचे महत्व स्पष्ट केले. महाविद्यालयीन मुलींच्या स्वयंसुरक्षाबाबत शुभांगी माने यांनी मार्गदर्शन केले. यावेळी श्रीमती रेखाताई महाजन व प्राचार्य प्रा.डॉ. प्रशांत चौधरी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. संजय जोशी तर आभार प्रा. डॉ. जयश्री कुलकर्णी यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थिनी, महिला कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वच्छता-आरोग्यविषयक, स्वयंसुरक्षा विषयक व कायदेशीर मार्गदर्शन कार्यक्रम-वृत्तपत्रातील बातम्यांची कात्रणे

# महात्मा फुले जयंतीनिमित्त मुलींसाठी स्वयंसुरक्षा व कायदेशीर मार्गदर्शनाचे आयोजन




**उस्मानाबाद – समय सारथी**

**महात्मा फुले जयंतीनिमित्त येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय व सखी वनस्टॉप सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन मुलींसाठी आरोग्य व स्वच्छता, कायदेशीर सल्ला व मार्गदर्शन तसेच स्वयंसुरक्षा या बाबत मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**

या कार्यक्रमास रेखा महाजन, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. प्रशांत चौधरी, सखी वनस्टॉप सेंटरच्या वासंती मुळे, मनीषा जोगदंड, शुभांगी माने, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख अनिता लिंगे, अंतर्गत मूल्यमापन कक्ष प्रमुख अर्चना बनाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयातील अंतर्गत तक्रार समिती, महिला कक्ष व सखी वनस्टॉप सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात वासंती मुळे यांनी आरोग्य, स्वयंसुरक्षा व लिंगभाव समानता या विषयावर मार्गदर्शन केले. मनीषा जोगदंड यांनी मुलींच्या समुपदेशनाचे महत्व स्पष्ट केले. महाविद्यालयीन मुलींच्या स्वयंसुरक्षाबाबत शुभांगी माने यांनी मार्गदर्शन केले. यावेळी रेखा महाजन व प्राचार्य प्रा. डॉ. प्रशांत चौधरी यांनी आपले मनोगत यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. संजय जोशी तर आभार प्रा. डॉ. जयश्री कुलकर्णी यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थिनी, महिला कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# महाविद्यालयीन मुलींसाठी स्वयंसुरक्षा, कायदेशीर मार्गदर्शनाचे आयोजन




**उस्मानाबाद** (प्रतिनिधी) येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय व सखी वनस्टॉप सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालायीन मुलींसाठी आरोग्य व स्वच्छता, कायदेशीर सल्ला व मार्गदर्शन तसेच स्वयंसुरक्षा या बाबत मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास श्रीमती रेखाताई महाजन, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.प्रशांत चौधरी, सखी वनस्टॉप सेंटर च्या वासंती मुळे, मनीषा जोगदंड ,शुभांगी माने, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख अनिता लिंगे,अंतर्गत मूल्यमापन कक्ष प्रमुख अर्चना बनाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

महाविद्यालयातील अंतर्गत तक्रार समिती,महिला कक्ष व सखी वनस्टॉप सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमात वासंती मुळे यांनी आरोग्य,स्वयंसुरक्षा व लिंगभाव समानता या विषयावर मार्गदर्शन केले.याच बरोबर मनीषा जोगदंड यांनी मुलींच्या समुपदेशनाचे महत्व स्पष्ट केले. महाविद्यालयीन मुलींच्या स्वयंसुरक्षाबाबत शुभागी माने यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी श्रीमती रेखाताई महाजन व प्राचार्य प्रा.डॉ.प्रशांत चौधरी यांनी आपले मनोगत यावेळी व्यक्त केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. संजय जोशी यांनी केले

# व्यक्तिगत स्वच्छता-आरोग्यविषयक, स्वयंसुरक्षा विषयक व कायदेशीर मार्गदर्शन कार्यक्रम

### दि. ११.०४.२०२२, सोमवार सकाळी ११.३०

**उद्देश :-**

विद्यार्थिनींमध्ये व्यक्तिगत स्वच्छता व स्वयंआरोग्यविषयक जाणीव व जागृती निर्माण करणे, समाजात वावरत असताना स्वयंसुरक्षेविषयी सजगता आणणे, तसेच यासंदर्भातील कायदेविषयक सज्ञानता/साक्षरता यांच्यामध्ये निर्माण करणे हा या उपक्रमाच्या आयोजनामागील उद्देश होय.

सोमवार दिनांक ११.०४.२०२२ रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून सकाळी ११.३० ते १.३० यावेळेत कक्ष क्रमांक १८ मध्ये महिला कक्ष आणि अंतर्गत तक्रार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सखी वन-स्टॉप सेंटर –वुमेन्स हेल्प सेंटर यांच्या सहयोगाने 'व्यक्तिगत स्वच्छता व आरोग्यविषयक, स्वयंसुरक्षाविषयक आणि कायदेशीर मार्गदर्शन' कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात महात्मा फुले यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन व उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालयाच्या अंतर्गत तक्रार समिती अंतर्गत तक्रार समितीच्या पीठासन अधिकारी प्रा. अनिता लिंगे यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर सखी वन-स्टॉप सेंटरच्या कार्यकर्त्या श्रीमती वासंती मुळे यांनी विद्यार्थिनींना महिला सबलीकरण, त्याची गरज,

समाजातील महिलांची भूमिका व त्यांचे संरक्षण तसेच व्यक्तिगत स्वच्छता व आरोग्यविषयक याविषयावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात सखी वन-स्टॉप सेंटरच्या श्रीमती मनीषा जोगदंड यांनी कायदेविषयक सल्ला-मार्गदर्शनामध्ये महिलाविषयक हिंसाचार, शारीरिक शोषण,हुंडा पद्धती,हुंडाबळी, याविषयावर मार्गदर्शन केले. तर श्रीमती शुभांगी माने यांनी व्यक्तिगत काळजी, स्वयंसुरक्षा, स्वसंरक्षण याविषयावर उद्बोधन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनिता लिंगे यांनी केले. तर आभार प्रदर्शन महिला कक्ष प्रमुख प्रा.डॉ. जयश्री कुलकर्णी यांनी केले. या कार्यक्रमास ४५ विद्यार्थिनी व महाविद्यालयातील सर्व महिला कर्मचारी उपस्थित होत्या.

## उद्देशपूर्ती :-

विद्यार्थिनींमध्ये व महिला कर्मचाऱ्यांमध्ये व्यक्तिगत स्वच्छता व स्वयंआरोग्यविषयक जाणीव व जागृती निर्माण करण्यास, समाजात वावरत असताना स्वयंसुरक्षेविषयी सजगता आणण्यास, तसेच यासंदर्भातील कायदेविषयक सज्ञानता/साक्षरता यांच्यामध्ये निर्माण करण्यास या उपक्रमाच्या माध्यमातून सहाय्य झाले.